POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष -०५ ● अंक-६७ ● मुंबई, गुरुवार, ०९ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

## वसई-विरार पालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर!

### पालघरमधील ३ नगराध्यक्षांचे आरक्षण जाहीर

पालघर जिल्ह्यातील डहाणू, जव्हार आणि पालघर या तीन नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण आज जाहीर झाले आहे. डहाणू नगरपरिषदेत सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाले आहे. जव्हारमध्ये सर्वसाधारण महिला प्रवगार्चे आरक्षण तर महत्वपूर्ण अशा पालघर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदावर ओबीसी अर्थात नागरिकांचा मागासवर्ग असे आरक्षण जाहीर झाले आहे.आधी २०१९ मध्ये झालेल्या नगरपरिषदांच्या निवडणुकीच्या आरक्षणात डहाणू नगराध्यक्षपद सर्वसाधारण म्हणून आरक्षित होते. आगामी निवडणुकासाठी आज झालेल्या सोडतीत या नगरपरिषदेसाठी पुन्हा सर्वसाधारण आरक्षण पडले आहे. जव्हार नगरपरिषदेत या आधी ओबीसी साधारण असे आरक्षण होते. आज निघालेल्या आरक्षणात जव्हारमध्ये पुढे सर्वसाधारण स्त्री असे आरक्षण पडले आहे. पालघर नगरपरिषदेत यापूर्वी सर्वसाधारण स्त्रीचे आरक्षण होते. आता हे आरक्षण ओबीसी अर्थात नागरिकांचा मागसवर्ग असे आरक्षण जाहीर झाले आहे. डहाणू, पालघर आणि जव्हार नगरपरिषदेवर २०१९ मध्ये नगराध्यक्षपदाची निवडणूक थेट जनतेतून घेण्यात आली होती. त्यावेळी डहाणूमध्ये भाजपचे भरत राजपूत, जव्हारमध्ये शिवसेनेचे चंद्रकांत पटेल आणि पालघरमध्ये महाविकास आघाडीच्या डॉ. उज्वला काळे निवडून आल्या होत्या. त्यानंतर आता तिन्ही नगरपरिषदांचा कार्यकाळ संपल्यामुळे तिथे आता प्रशासक कार्यरत आहेत.

**■बातमी/लेख, प्रीती दिपक नाईक**

वसई-विरार महापालिकेच्या निवडणुकांसाठी अंतिम प्रभाग रचना सोमवारी जाहीर करण्यात आली आहे. या नव्या रचनेनुसार २९ प्रभाग असणार आहेत. २९ गावांच्या हरकती फेटाळण्यात आल्या असून ही गावे महापालिकेतच असणार आहे. त्यामुळे गावांचा मुद्दाही निकालात निघाला आहे. वसई-विरार महापालिकेने आगामी निवडणुकीसाठी प्रभाग रचना प्रारूप आराखडा तयार करून प्रसिद्ध केला होता. मुदतीच्या शेवटच्या दिवसांपर्यंत महापालिकेकडे १६० हरकती व सूचना नोंदविण्यात आल्या होत्या. विशेषतः यात २९ गावांतील दोन हजाराहून अधिक नागरिकांच्या सामूहिक हरकतींचाही समावेश होता. प्राप्त हरकती व सूचनांवर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात महापालिकेच्या सभागृहात सुनावणी पार पडली होती. त्यानुसार पालिकेने सोमवारी अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केली आहे.



**२९ प्रभाग, ११५ नगरसेवक**

जाहीर केलेल्या प्रभाग रचनेनुसार एका प्रभागात साधारणपणे ३८ ते ४७ हजार इतकी लोकसंख्या असणार आहे. यात २८ प्रभाग हे ४ सदस्यांचे तर एक प्रभाग हा तीन सदस्यांचा असणार आहे. २९ प्रभागात ११५ नगरसेवकांसाठी वसई विरार महापालिकेची निवडणूक होणार आहे.

**हरकती फेटाळल्या, २९ गावे पालिकेतच**

वसई तालुक्यातील २९ गावे महापालिका क्षेत्रातून वगळण्याची मागणी संबंधित गावांमधील २ हजारांहून अधिक नागरिकांनी केली होती. या संदर्भात सुद्धा सुनावणी घेण्यात आली असून निवडणूक आयोगाने सदर हरकती फेटाळल्या आहेत. परिणामी अनेक वर्षांपासून ग्रामीण आणि नागरी भाग अशा वादात अडकलेल्या २९ गावांचा समावेश अखेर वसई- विरार पालिकेतच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**प्रभाग क्रमांक ४ आणि १३ च्या हद्दीबाबत निर्णय**

पालिकेने प्रारूप प्रभाग रचनेमध्ये सर्व प्रभागांची हद्द निश्चित केलेली आहे. प्रभाग क्रमांक ४ आणि १३ च्या हद्दींसंदर्भात दाखल झालेल्या हरकतींवर आयोगाने निर्णय दिला आहे. त्यानुसार पालिकेकडून बदल करण्यात येणार आहे. तारवाडी नाल्याकडील परिसर प्रभाग क्रमांक १० मधून प्रभाग क्रमांक ४ मध्ये सामाविष्ट करण्याऐवजी सदर हद्द प्रारूप प्रभाग रचनेमध्ये प्रसिद्ध केल्यानुसारच ठेवण्यात यावी असा निर्णय आयोगाने दिला आहे. तसेच प्रभाग क्रमांक १३ च्या कळंब व वाघोली या गावांच्या सीमेवर असलेली हद्द प्राधिकृत अधिकार्यांनी प्रास्तावित केल्यानुसार सुधारित करण्यास हरकत नाही, असे मत आयोगाने नोंदविले आहे. विशेष म्हणजे हद्दींचे विभाजन

## मुंबई ८ ठिकाणी ईडीची छापेमारी

### फैसल शेख आणि अल्फिया शेख यांचे नेटवर्क उद्धवस्त

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ईडीने बुधवारी (०८ ऑक्टोबर) सकाळी ड्रग्ज नेटवर्कवर छापेमारी केली आहे. ईडीच्या मुंबई झोनल ऑफिस-१ च्या पथकाने मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायदा, २००२ अंतर्गत शहरातील आठ ठिकाणी छापे टाकले. हे छापे फैसल जावेद शेख आणि अल्फिया फैसल शेख यांच्या ड्रग्ज नेटवर्कशी जोडलेले आहेत. ईडीला संशय आहे की, दोघांनी ड्रग्ज तस्करीतून मोठी रक्कम कमावली असून मनी लाँड्रिंगद्वारे लाँड्रिंग करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच ईडीने केरळमधील १७ ठिकाणी देखील छापेमारी केली आहे.

ईडीच्या तपासात असे दिसून आले आहे की, फैसल शेखने कुख्यात ड्रग्ज पुरवठादार सलीम डोलाकडून एमडी (मेफेड्रोन) खरेदी केले होते. सलीम डोला हा ड्रग्ज तस्करीच्या जगात एक प्रमुख व्यक्ती आहे आणि त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. तसेच सलीम डोला हा बराच काळ फरार असल्याने आणि आंतरराष्ट्रीय ड्रग्ज नेटवर्कला निधी पुरवण्यात त्याचा सहभाग असल्याने, त्याच्या अटकेसाठी नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने बक्षीस जाहीर केले आहे. ईडीचे पथक सध्या अशा ठिकाणांची चौकशी करत आहेत, जिथे ड्रग्ज मनी आणि संबंधित मालमत्तांचे पुरावे सापडण्याची शक्यता आहे. अधिकाऱ्यांच्या मते, या नेटवर्कने कोट्यवधी रुपयांच्या बेकायदेशीर उत्पन्नाला वैध करण्याचा प्रयत्न केला.

मुंबईतील ड्रग्ज आणि हवालाच्या खोलवरच्या संबंधांना उघड करण्यासाठी ही कारवाई एक प्रमुख दुवा मानली जात आहे. कारण सलीम डोला हा दाऊद इब्राहिमचा जवळचा सहकारी आहे. जूनमध्ये भारतीय तपास संस्थांनी त्याला दुबईहून भारतात प्रत्यार्पण केले होते.

**केरळमध्ये १७ ठिकाणी छापेमारी**

दरम्यान, भूतानमधून भारतात लक्झरी वाहनांच्या कथित तस्करीशी संबंधित अलिकडच्या कस्टम्स प्रकरणाच्या चौकशीचा भाग म्हणून ईडीने आज केरळमधील अभिनेते पृथ्वीराज, दुलकर सलमान, अमित चक्ककल आणि इतर अनेकांशी संबंधित परिसरांवर छापे टाकले. ईडीने एनार्कुलम, त्रिशूर, कोझिकोड, मलप्पुरम, कोट्टायम आणि कोइम्बतूर येथील अनेक वाहन मालक, ऑटो वर्कशॉप आणि व्यापाऱ्यांच्या जागेवरही छापे टाकले. एकूण १७ जागेवर छापे टाकले आहेत, अशी सुत्रांची माहिती आहे. सीमाशुल्क विभागाने अलीकडेच उघड केलेल्या एका प्रकरणाच्या संदर्भात परकीय चलन व्यवस्थापन कायदा अंतर्गत ही कारवाई केली जात आहे.

## ३८ हजार ६२० चौ.फुट अनधिकृत बांधकाम निष्कासित

**■विरार। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत ७ ऑक्टोबर रोजी पालिकेचे आयुक्त मनोजकुमार सुर्यवंशी यांच्या निदेर्शानुसार विविध प्रभागांमध्ये अनधिकृत व अतिधोकादायक बांधकामांवर मोठ्या प्रमाणावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ३८ हजार ६२० चौ.फुट बांधकामांचे निष्कासन करण्यात आले. वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत ही कारवाई करण्यात आली. यासाठी प्रत्येक प्रभागासाठी एक वरिष्ठ लिपिक व चार कनिष्ठ अभियंत्यांचे विशेष पथक नेमण्यात आले आहे. या मोहिमेत आयुक्त, अतिरिक्त आयुक्त (उत्तर व दक्षिण) व उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पथके कार्यरत राहणार आहेत. प्रभाग 'अ' मध्ये दिशा अपार्टमेंट, एम.बी. इस्टेट, विरार (प.) येथे ३०० चौ.फुट बांधकाम निष्कासित करण्यात आले. प्रभाग ह्यबह्ण मध्ये निळकंठ इमारत, बजरंगनगर, मोरेगाव तलावाजवळ ८०० चौ.फुट बांधकामावर कारवाई झाली.

प्रभाग 'क' मध्ये विरार ते फुलपाडा परिसरात पोलीस सहकायार्ने अनधिकृत टर्पयांवर कारवाई करण्यात आली. प्रभाग ह्यईह्ण मध्ये हनुमाननगर, नालासोपारा (प.) येथे १,२०० चौ.फुट बांधकामावर



निष्कासन झाले, तसेच टर्पयांवरही कारवाई झाली. प्रभाग 'फ' मध्ये वसई फाटा (नॅशनल हायवे) येथे तब्बल १२ हजार चौ.फुट बांधकाम निष्कासित करण्यात आले. तर प्रभाग 'जी' मध्ये गोल्डन चॅरिएट हॉटेल ते तुंगारेश्वर ब्रिज परिसरात २४ हजार ३२० चौ.फुट बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे.याशिवाय वालीव आणि नालासोपारा (प.) येथे हातगाड्या व टर्पयांवर अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. महानगरपालिकेची शहरातील अनधिकृत बांधकामांवर नियमितपणे कारवाई सुरू राहणार असून नागरिकांनी नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर पावले उचलली जातील असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.

## भाईदरमध्ये आरोपी हॅक करायचे मोबाईल, त्यानंतर त्यावरून मोबाईल ऑर्डर करायचे

**■भाईदर। प्रतिनिधी,**

इंटरनेटच्या ऑनलाईन युगात मोठ्या प्रमाणात फसवणूक होण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. असाच एक प्रकार भाईंदरमध्ये समोर आला होता.त्यानंतर पोलीस प्रशासनाने या सायबर चोरी प्रकरणातील आरोपींना अटक केली आहे.हे आरोपी देशभरात सायबर फसवणूक करून मोबाईलवर बल्क मेसेज आणि लिंक पाठवून फसवणूक करत होते. लिंक उघडताच मोबाईल मेसेज हॅक करून त्याद्वारे ई-कॉमर्स कंपन्यांकडून मोबाईल सारख्या महागड्या वस्तू मागविल्या जायच्या.हे आरोपी त्याची डिलिव्हरी विविध ठिकाणी घेत होते. अशा सायबर गुन्हे करणाया टोळीचा भाईंदर पोलिसांनी पदार्फाश करत १०७ महागडे मोबाईल असे ५० लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत सात जणांना अटक केली आहे. यात पोलिसांनी आंतरराज्य टोळींचा पदार्फाश केला आहे.

आरोपी देशात विविध लोकांचे मोबाईल हॅक करून त्यांचा ओटीपी मिळवून मोबाईल ऑनलाईन खरेदी करून त्याची डिलीव्हरी विविध ठिकाणी घेत होते. त्यानंतर ते अन्य लोकांना विक्री करत होते. सदरील मोबाईल हे जास्त प्रमाणात ऑनलाईन मागवत असल्याने त्याची माहिती भाईंदर पोलिसांना ई कॉमर्स कंपनीकडून मिळाली होती.एकदा आरोपींनी जळगावमध्ये राहणाया




नागरिकाच्या बँक खात्यामधून ४ लाख ७७ हजार ९८९ रुपयांची ऑनलाईन शॉपिंग करून आठ मोबाईल मागवले होते. याप्रकरणी सदरील मोबाईलची डिलिव्हरी घेत असताना पोलिसांनी रिंकू कुमार भैरवा याला ताब्यात घेत गुन्हा दाखल करून अटक केली होती. त्यानंतर त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता पुष्पेन्द्र कुमार उर्फ पिके हा जयपूर राजस्थान याच्या सांगण्यावरून तो भाईंदर पश्चिम येथे डिलिव्हरी घेण्यासाठी आला होता. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता सदरील व्यक्ती हा विविध ठिकाणाहून नागरिकांचा डाटा गोळा करत होता.

सदरील तांत्रिक गुन्हा तपास करून यात दिल्ली, हिमाचल प्रदेश, राजस्थान, नवी मुंबई या ठिकाणाहून रिंकू कुमार भैरवा (वय २९ वर्ष रा. अलवर, राजस्थान,) कौस्तुभ जाधव (वय २१ वर्ष रा. नवी मुंबई,) मीत भानुशाली (वय २२ वर्ष रा. भाईंदर पश्चिम,) पुष्पेन्द्र कुमार (वय २६ वर्ष रा. मध्य प्रदेश), देव यादव (वय २३ वर्ष रा. दिल्ली), रमिझ शेख (रा. भिवंडी) आणि गुन्ह्यातील मुख्य आरोपी हार्डी उर्फ प्रिन्स सजनानी (वय २० वर्षे रा. बिलासपूर, छत्तीसगड) यांना सापळा रचून अटक केली आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी नामांकित कंपन्याचे एकूण १०७ मोबाईल आणि ४ लाख रकमेसह ५० लाख ५८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण, सहायक पोलीस आयुक्त ममता डिसोजा यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कांबळे, पोलीस निरीक्षक महेंद्र निंबाळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव कतुरे, संजय शिंपणे पोलीस उपनिरीक्षक अर्जुन जाधव, सहाय्यक फौजदार राजेश पानसरे, पोलीस हवालदार सतीश सरनाईक, सुशील पवार, प्रशांत भोगटे, राजेश श्रीवास्तव, रामनाथ शिंदे, पोलीस अंमलदार राहुल काटकर, रवींद्र वाघ, भीमराव वैतागे, विशाल भोई व जे. जाधव यांनी केलेली आहे.

## अतिवृष्टीमुळे आर्थिक तडजोड... मंत्री आदिती तटकरे यांचे स्पष्टीकरण

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना महायुती सरकारने विचारपूर्वक आणली आहे. एक दीड वषार्पासून लाडक्या बहिणी योजनेचा लाभ घेत आहेत. मात्र सद्यस्थितीत राज्यातील अनेक जिल्ह्यांना अतिवृष्टीचा तडाखा बसला असून पूरग्रस्तांना मदत करणे याला महायुती सरकारने प्राधान्य दिले आहे. त्यामुळे काही योजनांवर ताण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. पूरस्थिती आणि नुकसानग्रस्तांना मदत यामुळे राज्य सरकारच्या काही विभागांवर आर्थिक ताण येऊ शकतो, असे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

लाडकी बहिण योजना महायुती सरकारने आणली आहे. महिला या योजनेमुळे खूप खूश आहेत; ही योजना एक वषार्पासून सुरू असून, राज्य सरकारने वार्षिक



बजेटचा विचार करूनच मंजूर केली आहे. अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीचा फटका प्रत्येक विभागाला बसणार आहे. लाडकी बहिण योजनेव्यतिरिक्त इतर महत्त्वाचे आर्थिक घटकही आहेत, त्यामुळे आमच्या विभागासह प्रत्येक विभागाला तडजोड करावी लागणार आहे. अतिवृष्टीग्रस्त क्षेत्रातील शेतक-यांना व नागरिकांना नुकसान भरपाई देणे, विस्कळीत झालेले जनजीवन पूर्वपदावर आणणे हे सध्या प्राधान्य आहे, असेही त्या म्हणाल्या.

निधी मिळाल्यानंतर दिवाळीचा लाभ

सणासुदीच्या काळात लाडक्या बहिणींना लाभ मिळावा असा सरकारचा प्रयत्न आहे. महिला बालकल्याण विभागाकडून प्रक्रिया मान्यतेसाठी दिली आहे, त्या कालावधीत निधी प्राप्त व्हावा, अशी अपेक्षा आहे. ज्या क्षणी निधी प्राप्त होईल त्यावेळी लाभ वितरीत केला जाईल, असे ही त्या म्हणाल्या.

भुजबळांची कबुली

लाडकी बहिण योजनेमुळे अन्य योजनांवर आर्थिक ताण येत असल्याची कबुली महायुतीतील मंत्री छगन भुजबळ यांनी नुकतीच दिली. त्यापाठोपाठ आता महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही मंत्री भुजबळ यांच्या हो ला हो म्हणत दुजोरा दिला आहे.

## मान्सूनची माघार आठवडाअखेरपर्यंत लांबणार, मुंबई-कोकणात स्थिती काय? हवामान खात्याची माहिती



### मागील काही वर्षांतील पावसाची माघार

दरम्यान, गेल्या वर्षी १५ ऑक्टोबर रोजी मुंबईतून नैऋत्य मौसमी वाऱ्यांची माघार होऊन ईशान्य मान्सून सुरु झाल्याचे जाहीर झाले होते. यावर्षी मान्सून कधी माघारी फिरणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मागील काही वर्षांचा विचार केल्यास, मान्सून माघारी फिरण्याच्या तारखा बदलत असल्याचे दिसून येते. २०२२ आणि २०२३ मध्ये मुंबईतून मान्सून २३ ऑक्टोबर रोजी परतला होता. तर २०२१ मध्ये १४ ऑक्टोबर रोजी मान्सूनने निरोप घेतला होता. यावरून असे दिसते की, मान्सून माघारी फिरण्याची तारीख दरवर्षी बदलू शकते. हवामान खात्याकडून यावर्षीच्या मान्सून माघारीच्या तारखेची अधिकृत घोषणा लवकरच केली जाईल.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईमधून मान्सूनच्या माघारीची सर्वसाधारण तारीख ८ ऑक्टोबर असते, मात्र गेल्या वर्षाप्रमाणे यंदाही मान्सून या तारखेला माघारी परतण्याची चिन्हे नाहीत. अजूनही वातावरणात आर्द्रता असल्याने मान्सून माघार जाहीर करण्यासाठी अपेक्षित स्थिती निर्माण झालेली नाही. बुधवार, गुरुवार या दोन दिवसांमध्ये राज्याच्या उत्तर भागातून मान्सून परतू शकतो. त्यानंतर आठवडाअखेरपर्यंत मुंबईतूनही माघार जाहीर केली जाऊ शकते, असा अंदाज आहे.

मुंबईत मंगळवारी सकाळी ८.३० पर्यंतच्या २४ तासांमध्ये कुलाबा येथे ५.४ मिलीमीटर, तर सांताक्रूझ येथे ०.१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. मुंबईत आज, बुधवारी मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता आहे. त्यानंतर ११ ऑक्टोबरपर्यंतच्या पूवार्नुमानानुसार हलक्या सरींची उपस्थिती असण्याचा अंदाज आहे. मुंबईत अजूनही आर्द्रता ७५ टक्क्यांच्या पुढे आहे. मंगळवारी सकाळच्या सुमारास कुलाबा येथे ९०, तर सांताक्रूझ येथे ८३ आणि संध्याकाळी ५.३० च्या सुमारास कुलाबा येथे ७९, तर सांताक्रूझ येथे ७१ टक्के आर्द्रता होती. त्यातच अजूनही पश्चिमी प्रकोप प्रणाली सक्रिय असल्याने मान्सूनची माघार विलंबाने होत आहे.

मंगळवारी वर्तवलेल्या पूवार्नुमानानुसार रत्नागिरीमध्ये आज, बुधवारी तर सिंधुदुर्गात शुक्रवारपर्यंत मेघगर्जनेसह विजा आणि मध्यम पावसाची शक्यता आहे. त्यामुळे राज्यातील उत्तरेकडून मान्सून माघारी फिरला तरी उर्वरित महाराष्ट्रातून मान्सून माघार जाहीर करण्यासाठी पुढच्या आठवडा उजाडेल अशीही एक शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## मुंबईत इच्छुकांची धडधड वाढली

### एससी आणि एसटीसाठी राखीव १७ प्रभागांचं आरक्षण ठरलं

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी लवकरच रंगणार असून शहरातील प्रभागांचे आरक्षण निश्चित झाले असून, २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेले प्रभाग आता स्पष्ट झाले आहेत. शहरातील एकूण १७ प्रभागांपैकी १५ प्रभाग अनुसूचित जातीसाठी व २ प्रभाग अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आले असून ज्या प्रभागांमध्ये रउ व रळ लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे, अशा प्रभागांची आरक्षण सोडत काढण्यात आली आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार मुंबई शहराची एकूण लोकसंख्या १ कोटी २४ लाख ४२ हजार ३७३ आहे. यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या ८ लाख ३ हजार २३६ असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या १ लाख २९ हजार ६५३ आहे. या आकडेवारीच्या आधारावरच प्रशासनाकडून प्रभागांचे आरक्षण ठरवण्यात आलं आहे.

**अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभागांमध्ये कुठल्या भागाचा समावेश?**

अनुसूचित जातीसाठी




राखीव असलेल्या प्रभागांत वांद्रे पूर्व सरकारी वसाहत, एमआयजी कॉलनी (प्रभाग ९३), कन्नमवार नगर, विक्रोळी (प्रभाग ११८), गरोडिया नगर, घाटकोपर पूर्व (प्रभाग १३३), गौतम नगर, टाटा नगर (प्रभाग १४०), अण्णाभाऊ साठे नगर, गोवंडी (प्रभाग १४१), चेंबूर अणुशक्ती नगर, बीएआरसी (प्रभाग १४६), आरसीएफ कॉलनी, चेंबूर (प्रभाग १४७), ठक्कर बाप्पा कॉलनी, चेंबूर (प्रभाग १५१), चेंबूर गावठाण, पोस्टल कॉलनी (प्रभाग १५२), चेंबूर माहूल व्हिलेज, सुमन नगर (प्रभाग १५५), धारावी आगार, नेचर पार्क (प्रभाग १८३), धारावी व्हिलेज पूर्व, मुकुंद नगर (प्रभाग १८६), माटुंग लेबर कँप (प्रभाग १८९), आर्थर रोड तुरुंग परिसर, धोबीघाट परिसर (प्रभाग १९९) व ताडदेव आरटीओ रोड, चिखलवाडी (प्रभाग २१५) यांचा समावेश आहे.

दुसरीकडे, आरे कॉलनी, चित्रनगरी गोरेगाव (प्रभाग ५३) आणि वसोर्वा, साईनगर (प्रभाग ५९) हे प्रभाग अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. या प्रभागांमध्ये रळ लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्याने त्यांना हे आरक्षण मिळालं आहे.

दरम्यान, मुंबई महापालिकेच्या प्रभाग रचनेला राज्य निवडणूक आयोगाने मंजुरी दिल्यामुळे आता माजी नगरसेवकांचे लक्ष आरक्षण सोडतीकडे लागलं आहे. सन २०११च्या जनगणनेच्या आधारावर ही निवडणूक होणार असल्याचं महानगरपालिकेने स्पष्ट केल्यानंतर त्याचे विवरणही प्रसिद्ध केलं आहे. या विवरणानुसार, मुंबईतील नेमके कोणते १७ प्रभाग अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी (एससी-एसटी) राखीव असतील, हे स्पष्ट झालं आहे. दिवाळीनंतर आरक्षण सोडत निघण्याची दाट शक्यता असल्यामुळे वेगाने घडणाऱ्या घडामोडींमुळे बाशिंग बांधून बसलेल्या माजी नगरसेवकांसह इतर इच्छुकांचीही धाकधूक वाढली आहे.

# ७ टिप्सच्या मदतीने करा घर साफ

स्वच्छता तेथे लक्ष्मीचा वास असं म्हटलं जातं की, ज्या घरात साफसफाई आणि स्वच्छता असते तेथे लक्ष्मीचा वास असतो. दिवाळी हा देवी लक्ष्मीचा सण. या सणात देवी लक्ष्मीची मनोभावे पूजा केली जाते. अशावेळी स्वच्छता करण्यासाठी ७ टिप्स तुम्हाला साफसफाई करण्यास मदत करतात.

- चांदी आणि पितळेच्या भांड्यांना चमक परत मिळवण्यासाठी, त्यांना पीठ किंवा मुलतानी मातीने घासून घ्या. हा एक जुना उपाय आहे जो साचलेली घाण काढून टाकतो आणि त्यांना चमकदार बनवतो. कारण यापासून आपल्या दिवाळीची खरी सुरुवात होते.
- कोपऱ्यात आणि कपाटात कापूरचे काही तुकडे ठेवा. कापूर केवळ ओलावा आणि कीटकांना दूर ठेवत नाही तर त्याचा तीव्र आणि शुद्ध सुगंध संपूर्ण घरात पसरतो. हे घरात सकारात्मक ऊर्जा भरते आणि एक आल्हाददायक वातावरण निर्माण करते.
- जर तुमच्या भिंतींवर किंवा दारावर किरकोळ डाग असतील तर बेसन आणि थोडी हळद यांची पेस्ट बनवा आणि डाग असलेल्या ठिकाणी लावा. थोडा वेळ सुकू द्या आणि नंतर ओल्या कापडाने पुसून टाका. ही पेस्ट डाग हलके करण्यास मदत करते आणि भिंतींना हलका पिवळा चमक देते.
- वाळलेल्या कडुलिंबाची पाने कापडात बांधा किंवा थेट कपाटात आणि स्वयंपाकघराच्या कोपऱ्यात ठेवा. कडुलिंब हे एक शक्तिशाली नैसर्गिक कीटकनाशक आहे. त्याचा तीव्र वास झुरळे आणि मुंग्यांसारख्या कीटकांना दूर ठेवतो. हा उपाय तुमच्या घराचे वातावरण रासायनिक फवारण्याशिवाय स्वच्छ आणि सुरक्षित ठेवतो.
- थोडेसे मोहरीचे तेल आणि मीठ मिसळा आणि ते तुमच्या जुन्या आणि फिकट लाकडी फर्निचरवर हळूवारपणे चोळा. हे मिश्रण लाकडाचे पोषण करते आणि त्याची नैसर्गिक चमक पुनर्संचयित करते. फक्त काही मिनिटांच्या प्रयत्नाने, तुमचे जुने फर्निचर देखील नवीनसारखे चमकेल, तुमच्या घराचे स्वरूप पूर्णपणे बदलेल.
- एक कप व्हिनेगर एक बादली पाण्यात मिसळा आणि फरशी पुसून टाका. व्हिनेगर हे एक नैसर्गिक जंतुनाशक आहे जे फरशीवरील जंतू मारते आणि त्यांना चमकदार ठेवते. ते फरशींवरील कोणताही वास देखील काढून टाकते. ज्यांना त्यांचे घर पूर्णपणे स्वच्छ आणि सुरक्षित ठेवायचे आहे त्यांच्यासाठी ही रेसिपी उत्तम आहे.
- लिंबाचा रस आणि बेकिंग सोडा मिसळून जाड पेस्ट बनवा. स्वयंपाकघरातील सिंक, बाथरूमच्या टाइल्स आणि नळांवरून डाग काढण्यासाठी या पेस्टचा वापर करा. लिंबातील आम्ल आणि बेकिंग सोडाचे स्वरूप अगदी हट्टी डाग देखील सहजपणे काढून टाकते.



# फराळ करण्यापूर्वी करून ठेवा या गोष्टी

दिवाळी म्हटले की, प्रत्येक घरात फराळ करण्याची लगबग सुरू होते. करंजी, चकली, लाडू, शंकरपाळी, अनारसे आदी गोड पदार्थ घरात बनवले जातात. दिवाळीला अवघे काही दिवसच शिल्लक असल्याने दिवाळीनिमित्त तयार केल्या जाणाऱ्या फराळाची लगबग आता घरोघरी सुरू झालेली दिसत आहे. तुमच्याही घरातील गृहिणी फराळ बनवण्याच्या तयारीला लागल्या असतील. रोजची कामे, स्वयंपाक सर्व करून फराळ बनवण्यासाठी दररोज थोडा वेळ काढला जातो. अशा परिस्थितीत, विकेंडला निमित्त साधून फराळ करण्याच्या बेत आखला जातो. जर तुम्ही सुद्धा विकेंडला फराळ बनवत असाल तर लागणारी बेसिक तयारी आधीच कशी करायची यासंदर्भात टिप्स पाहूयात,

**टिप्स :**

- सर्वात पहिले काम यंदा तुम्ही फराळाचे कोणते पदार्थ बनवणार आहात याची यादी करा.
- फराळाला चव आणणारे पदार्थ म्हणजे साखर आणि वेलची. त्यामुळे वेलची, साखर जास्तीची घरात आणून ठेवा.
- चिवडा, शेव, शंकरपाळी यासारख्या पदार्थांसाठी लागणारे बेसन, तांदळाचे पीठ, विविध डाळी एकाचवेळी निवडून, स्वच्छ करून आणि चाळून एका डब्यात भरून ठेवा.
- फराळाच्या पदार्थांसाठी लागणारा गरम मसाला, मीठ, तिखट एका डब्यात भरून ठेवा. यामुळे ऐनवेळी मसाले आणायची आणि शोधायची गरज पडणार नाही.
- चकलीच्या पिठासाठी डाळीचे पीठ भाजले जाते. अशा परिस्थितीत जर तुमच्याकडे भाजलेले साहित्य
- आधीच तयार असेल तर चकल्या बनवायला वेळ लागणार नाही.
- लाडू, चिवडा किंवा इतर पदार्थांसाठी लागणारे सुका मेवा, ड्राय फ्रुट्स, खोबरे आधीच कापून आणि किसून ठेवा. खोबरे हवाबंद डब्यात भरून ठेवल्याने खराब होत नाही आणि गरजेनुसार वापरता येते.
- दिवाळीचा फराळ बनवताना तेल-तूप वापरले जाते. त्यामुळे तेल तूपाच्या जास्तीच्या पिशव्या घरात आणून ठेवाव्यात.
- चिवडा बनवण्यासाठी शेंगदाणे, लसणाच्या पाकळ्या लागतात. अशा परिस्थितीत तुम्ही शेंगदाणे आधीच भाजून त्याची साले काढून ठेवू शकता.
- ज्या दिवशी करंज्या बनवणार आहात त्याच्या आदल्या दिवशी नारळ खोवून करंजीचे सारण बनवून ठेवावे.
- अनारसे, लाडू किंवा शंकरपाळी यांसारखे काही गोड पदार्थ दिवाळीच्या आधी काही दिवस बनवून ठेवू शकता, जेणेकरून ऐन सणासुदीला धावपळ होणार नाही.
- कोणत्या दिवशी कोणते पदार्थ बनवायचे याचे नियोजन करा. उदा. वीकेंडला दोन ते तीन पदार्थ बनवण्याचे नियोजन करा म्हणजे फराळ बनवताना डोकेदुखी वाटणार नाही.



# दिवाळीसाठी आऊटफिट शोधताय? 'हे' आहेत ट्रेंडिंग ड्रेसेस

दरवर्षी दिवाळीची आतुरतेने वाट पाहिली जाते. दिवाळी जवळ आली की सर्व बाजारपेठा उजळून निघतात. खरेदी करण्यासाठी ग्राहकांची झुंबड उडते. सणानिमित्त घर सजावटीच्या वस्तू, कपडे, भेटवस्तू अशी बरीच खरेदी केली जाते. तुम्हीही कपडे खरेदी करण्याचा विचार करत असाल तर काही ट्रेंडिंग आऊटफिट तुम्ही यंदाच्या दिवाळीला ट्राय करू शकता.

- **गाला गाऊन :** आजकाल गाला गाऊनचा फॅशन ट्रेंड आहे. साटन, व्हेल्वेट, सिल्क ते कॉटनमध्ये हे गाऊन उपलब्ध असतात. सॅन-उत्सवांसह पार्टीसाठी हे एक उत्तम आऊटफिट आहे. आर्टिस्टिक डिझाइन, प्रिंट आणि फ्रिल्स असलेले गाऊन तुम्हाला ग्लॅमरस लूक देतात.
- **इंडो–वेस्टर्न आउटफिट्स :** पारंपरिक आणि मॉडर्न कॉम्बिनेशन तुम्हाला तुमच्या आऊटफिटमध्ये हवे असेल तर इंडो-वेस्टर्न आउटफिट्स हा सर्वात चांगला पर्याय आहे. आजकाल सण- उत्सवांमध्ये या इंडो-वेस्टर्न आउटफिट्सना महिलांची विशेष पसंती असते. लॉन्ग स्कर्ट, धोती, जंपसूट, प्लाझो असे पॅटर्न तुम्ही निवडू शकता.
- **अनारकली :** अनारकली हा असा ड्रेस सर्वांना शोभून दिसतो. तसेच दिवाळीसारख्या सणासाठी हा उत्तम पर्याय आहे. अनारकली सुट्सना सण- उत्सव आणि लग्नसराईच्या काळात बाजारात प्रचंड मागणी असते. नेट, शिफॉन, जॉर्जेटपासून थेट कॉटनपर्यंत विविध कापडांमध्ये हे सुट्स उपलब्ध असतात. यावर जरी वर्क, हँडप्रिंट्स आणि ब्लॉक प्रिंटसह असंख्य डिझाईन असते.
- **लेहेंगा :** लेहेंगा-चोली हा प्रकार फार पूर्वीपासून गुजराती आणि मारवाडी समाजात पाहायला मिळायचा. पण आता पारंपरिक लेहेंगा हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. अगदी प्रत्येक उत्सवासाठी तरुणींची लेहेंग्याला विशेष पसंती असते. या दिवाळीत लेहेंगा घालून तुम्ही एक पारंपरिक लूक मिळवू शकता.
- **साडी :** साडी प्रत्येक महिलेच्या आवडीचा विषय असतो. त्यामुळे साडी ही कधीच आऊट ऑफ फॅशन नसते. तुम्हाला दिवाळीला पारंपरिक लूक करायचा असेल तर सिल्क, जॉर्जेट, ऑर्गेन्झा, खादी, लिननच्या साड्या स्टाईल करू शकता. यासाठी तुम्ही वेगवेगळे डिझायनर ब्लाउज शिवून घेऊ शकता. ज्यामुळे तुमच्या साडीचा लूक आणखीनच खुलून दिसेल.




# सणासुदीत मेकअप करताय? त्वचा आणि केसांचे संरक्षण कसं करायचं!

भारतातील सणासुदीचा काळ नेहमीच उत्साहाने भरलेला असतो, सर्वत्र दिव्यांची रोषणाई, प्रत्येक घरात गोड पदार्थ आणि जवळजवळ रोज काही ना काही साजरा करण्याचे कारण! पण याच वेळी, आपल्या त्वचेवर आणि केसांवर याचा खूप परिणाम होतो. फटाक्यांचा धूर, तेलकट आणि गोड पदार्थ, उशिरापर्यंतच्या जागरणांमुळे त्वचा निस्तेज आणि कोरडी होते. स्वयंपाकघरात तासन्तास उभे राहणे किंवा थोडेफार पेय घेतल्यानेही त्यात भर पडते. या काळात त्वचा आणि केस तजेलदार ठेवण्यासाठी सर्वात चांगले उपाय म्हणजे साधी, नियमित दिनचर्या आणि काही उत्तम उत्पादने वापरणे. चला स्वतःची काजी कशी घ्यायची याबद्दल अभय हेल्थच्या व्यवस्थापकीय संचालक अपूर्व मोदी अधिक माहिती जाणून घेऊयात..

- **हायड्रेशन :** सणासुदीच्या काळात त्वचा आणि केसांना नेहमीपेक्षा जास्त पाण्याची गरज असते! पुरेसे पाणी प्या, हलका मॉइश्चरायझर वापरा आणि सकाळी एक हायड्रेटिंग हेअर सिरम लावा. आर्द्रता न राखल्यास त्वचा सोलू लागते आणि केस कोरडे व तुटक होतात, विशेषतः फटाक्यांच्या धुराचा आणि धुळीचा जास्त संपर्क झाल्यास.
- **सूर्यप्रकाशापासून संरक्षण :** बऱ्याच सणांच्या उत्सवांचा काळ दिवसाच्या वेळी असतो, ज्यात सूर्यप्रकाशातील किरणे त्वचा आणि टाळूसाठी हानिकारक ठरतात. त्यामुळे ब्रॉड-स्पेक्ट्रम रढञ 30+ सनस्क्रीन वापरा, तसेच वश संरक्षण देणारा लीव्ह-इन हेअर सिरम लावा, ज्यामुळे हानिकारक किरणांपासून बचाव होईल.
- **डिटॉक्स आणि रिफ्रेश :** प्रदूषण आणि फटाक्यांच्या धुरामुळे त्वचा आणि केस थकलेले वाटतात. हलका क्लेंझर, पौष्टिक फेस मास्क आणि सौम्य शँपूने केस धुणे हे तजेला आणि मऊपणा परत आणण्यासाठी पुरेसे असते.
- **घटक :** ॲलोव्हेरा, व्हिटॅमिन ई आणि नैसर्गिक तेलांसारखे अँटिऑक्सिडंट्सयुक्त घटक त्वचेला मुक्त रॅडिकलसपासून संरक्षण देतात आणि पर्यावरणीय हानीपासून बचाव करतात.
- **अंतर्गत पोषण :** सौंदर्य हे फक्त बाह्य नसते. आपल्या आहारात अँटिऑक्सिडंट्स, फळे, सुके मेवे आणि पाणीदार अन्नपदार्थ समाविष्ट करा. प्रथिने, जीवनसत्त्वे आणि ओमेगा-3 युक्त पदार्थ केस आणि त्वचेसाठी चमत्कारिक ठरतात.
- **आवश्यक आपत्कालीन किट :** लांब चालणाऱ्या सणांच्या कार्यक्रमात एक छोटा 'सर्व्हायव्हल किट' तुमचा तारणहार ठरू शकतो. त्यात मिनी मॉइश्चरायझर, लिप बाम, हँड क्रीम, ड्राय शँपू आणि फेस मिस्ट यांचा समावेश असावा, जेणेकरून चालता-बोलता त्वचा आणि केसांची निगा राखता येईल.

संतुलन महत्त्वाचे आहे. योग्य उत्पादने, पोषण आणि त्वचेची काळजी यामुळे तुम्ही छानप्रकारे सण साजरे करू शकता आणि सुंदर तेजाने झळकू शकता.

या सणासुदीत, तुमची ब्युटी रूटीन साधी आणि परिणामकारक ठेवा.



# सगळे उपाय झाले तरी केस गळणं थांबत नाहीय?
## मेथी बियांसह हे घरगुती ५ उपाय आजच ट्राय करा

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत केस गळणे ही समस्या झपाट्याने वाढत आहे. ताणतणाव, प्रदूषण, चुकीचा आहार आणि रासायनिक प्रॉडक्ट्सचा अतिवापर हे यामागील मुख्य कारणं मानली जातात. महागडे हेअर केअर प्रॉडक्ट्स अनेकदा परिणामकारक ठरत नाहीत, अशा वेळी घरगुती उपाय हा सर्वात सोपा आणि नैसर्गिक मार्ग ठरू शकतो. या उपायांमध्ये वापरले जाणारे घटक नैसर्गिक असल्याने त्यांचे कोणतेही साइड इफेक्ट्स होत नाहीत.

**१. नारळ तेल आणि लिंबाचा मिश्रण**

- नारळ तेल हे केसांच्या मुळांना पोषण देण्यासाठी ओळखले जाते. यात असलेले फॅटी ॲसिडस् आणि अँटिऑक्सिडंट्स केसांना मजबूत करतात.
- दोन चमचे नारळ तेलात एक चमचा लिंबाचा रस मिसळा, हलकं कोमट करा आणि टाळूवर मसाज करा.
- ३० मिनिटांनंतर माइल्ड शॅम्पूने केस धुवा.
- हा उपाय केस गळणे आणि कोंडा दोन्ही नियंत्रित करतो.

**२. मेथीच्या बियांचा पेस्ट**

- मेथीमध्ये निकोटिनिक ॲसिड आणि प्रोटीन मुबलक प्रमाणात असतात, जे नवीन केस वाढविण्यासाठी उपयुक्त आहेत.
- एक चमचा मेथी रात्रीभर पाण्यात भिजवून ठेवा.
- सकाळी ती वाटून पेस्ट तयार करा आणि टाळूवर लावा.
- ३०-४० मिनिटांनी थंड पाण्याने धुवा.
- आठवड्यातून दोनदा हा उपाय केल्यास केस गळतीत स्पष्ट फरक दिसेल.

**३. आवळा आणि दह्याचा मास्क**

- आवळा म्हणजे व्हिटॅमिन उ चा नैसर्गिक स्रोत आहे. तो केसांच्या मुळांना बळकटी देतो आणि अकाली पांढरे होणं थांबवतो.
- एक चमचा आवळा पावडरमध्ये दोन चमचे दही मिसळा.

हा मास्क केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत लावा आणि ३० मिनिटं ठेवा.

- हा उपाय स्कॅल्पला थंडावा देतो आणि केसांना घनता व मजबुती देतो.

**४. अलोवेरा जेलचा वापर**

- अलोवेरामध्ये असलेले एन्झाईम्स आणि अँटी-इन्फ्लेमेटरी गुणधर्म केसांची वाढ वाढवतात आणि स्कॅल्पवरील सूज कमी करतात.
- ताज्या अलोवेरा पानातून जेल काढा आणि थेट टाळूवर लावा.
- ४५ मिनिटांनंतर हलक्या शॅम्पूने केस धुवा.
- नियमित वापराने केस मऊ, रेशमी आणि चमकदार बनतात.

**५. कांद्याचा रस**

- कांद्यात सल्फर भरपूर प्रमाणात असतं, जे कोलेजन निर्मिती वाढवून केसांच्या वाढीस मदत करतं.
- कांद्याचा रस काढा आणि कॉटनच्या साहाय्याने स्कॅल्पवर लावा.
- ३० मिनिटांनंतर स्वच्छ धुवा.
- सुरुवातीला थोडी वासाची अडचण होईल, पण पहिल्याच आठवड्यात परिणाम दिसू लागतात.



# कॅन्सर, मधुमेहासह अनेक गंभीर आजार राहतील दूर...
## ड्रॅगन फ्रूटचे अफलातून फायदे तुम्हाला माहिती आहेत का?

आजकाल फिटनेस आणि हेल्दी लाईफस्टाईलचा ट्रेंड वाढताना दिसतोय. अशा वेळी आपल्या डाएटमध्ये एक फळ सातत्याने दिसतं, ते म्हणजे ड्रॅगन फ्रूट! दिसायला आकर्षक आणि चवीला गोड असलेलं हे फळ फक्त पौष्टिक नाही, तर आरोग्यदायी जीवनशैलीसाठीही उपयुक्त आहे. दक्षिण अमेरिकेतून जगभर पसरलेलं हे फळ 'पिटाह्या' या नावानेही ओळखले जाते. सॅलड, जॅम, जेली किंवा शेकच्या स्वरूपात याचे सेवन केले जाते. यात भरपूर अँटीऑक्सिडंट्स, फायबर आणि व्हिटॅमिन्स असतात, जे शरीराचं संतुलन राखतात.

**याचे काही जबरदस्त फायदे पुढीलप्रमाणे–**

- **मधुमेहासाठी लाभदायी** – ड्रॅगन फ्रूटमधील फ्लेव्होनॉइड्स आणि फिनोलिक ॲसिड रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. नियमित सेवन केल्याने डायबेटीसचा धोका कमी होतो.
- **हृदय आणि कोलेस्ट्रॉलसाठी उपयोगी** – यातील ओमेगा ३ आणि ओमेगा ९ फॅटी ॲसिड्स हृदय निरोगी ठेवतात. यामुळे वाईट कोलेस्ट्रॉल कमी होतात आणि चांगले कोलेस्ट्रॉल वाढतात.
- **मेंदूला तंदुरुस्त ठेवते** – ड्रॅगन फ्रूटच्या नियमित सेवनाने अल्झायमर आणि पार्किन्सन्ससारख्या आजारांचा धोका कमी होऊ शकतो.
- **कर्करोगापासून संरक्षण** – अँटीट्यूमर आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मांमुळे ड्रॅगन फ्रूट स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करण्यास मदत करते.
- **सांधेदुखीपासून आराम** – यातील अँटीऑक्सिडंट्समुळे संधिवात किंवा जळजळीमुळे होणाऱ्या वेदना कमी होतात.
- **रोगप्रतिकारक शक्ती वाढवते** – व्हिटॅमिन सी आणि कॅरोटीनोइड्समुळे शरीर संसर्गांपासून लढण्यास अधिक सक्षम बनतं.

थोडक्यात सांगायचं झालं, तर ड्रॅगन फ्रूट हे आरोग्य, सौंदर्य आणि ऊर्जेचं एक संपूर्ण पॅकेज आहे. आहारात याचा समावेश करा आणि शरीराला नैसर्गिक पोषण द्या!



# नामस्मरणाचा आयुष्यावर काय परिणाम होतो?



हिंदू धर्मात नामस्मरणाला अत्यंत महत्त्व दिलं गेलं आहे. आजच्या ताणतणावाच्या जीवनातही अनेकांना शांतता आणि स्थैर्य हवं असतं, पण त्यासाठी कोणती दिशा घ्यायची हे कळत नाही. ''नामस्मरणाचं आपल्या आयुष्यावर नेमका काय परिणाम होतो?''

**नामस्मरणाचं खरं महत्त्व**

कलियुगामध्ये भगवान श्रीकृष्णानेही गीतेमध्ये 'नामस्मरण' हे सर्वश्रेष्ठ साधन असल्याचं सांगितलं आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज, समर्थ रामदास स्वामी यांसारख्या अनेक संत परंपरांनी नामस्मरणाचं महत्त्व अधोरेखित केलं आहे. ''आपल्याकडे तीन प्रकारचे दैवत असतात इष्टदैवत, उपास्यदैवत आणि कुलदैवत. ज्याच्यावर श्रद्धा असेल, त्या दैवताचं नामस्मरण करावं. स्वामी समर्थ, गजानन महाराज, साईबाबा कोणतंही असो, श्रद्धेने घेतलेलं नामस्मरण मनाला शांती आणि आत्मशक्ती देतं.''

**मानसिक आणि आध्यात्मिक परिणाम**

नित्य नामस्मरणामुळे मन शांत राहतं, आत्मविश्वास वाढतो, आणि आयुष्य अधिक संतुलित होतं. ''जेव्हा मनातील नकारात्मक विचार कमी होतात, तेव्हा निर्णय क्षमता वाढते आणि जीवनात सकारात्मकतेचा प्रकाश निर्माण होतो.''

# एसटी कर्मचाऱ्यांना थकीत भत्ते, महागाई भत्ता, घरभाडे यांसह अन्य भत्ते देण्यास सरकार सकारात्मक - प्रताप सरनाईक



■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

एसटी कामगारांचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता यासह अन्य थकीत भत्ते दिवाळीपूर्वी देण्याबाबत सरकार सकारात्मक आहे. तसेच एसटी महामंडळ कामगारांच्या विविध मागण्या आहेत. त्या रास्त असून या मागण्या पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी कामगार संघटनांसोबत मंत्रालयात आयोजित बैठकीत सांगितले.

२०१८ पासून कर्मचाऱ्यांची आर्थिक देणी प्रलंबित असून ती देणी देण्यासाठी सुमारे ४४०० कोटी रुपये लागणार आहेत.

बैठकीस एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर, विविध संघटनांचे संदीप शिंदे, समीर मोरे, श्रीरंग बरगे, हनुमंत ताटे, प्रकाश निंबाळकर, मुकेश तिगोटे, प्रदीप धुरंधर यांच्यासह एसटी कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रत्येक वेळेस शासनाकडे निधी मागणी योग्य नाही. त्याकरिता एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. एसटीचा कार्यभार स्वीकारल्या पासून महामंडळाचे उत्पन्न वाढीसाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. जाहिरातीच्या माध्यमातून वर्षाला १०० कोटी रुपये, आधुनिक पार्सल सेवेच्या माध्यमातून वर्षाला १०० कोटी तसेच महामंडळाच्या बस आगारांत असलेले पेट्रोल पंप सध्या केवळ महामंडळाच्या बसकरिता इंधन पुरवठा करतात. भविष्यात हे पेट्रोल पंप व्यावसायिक स्वरूपात सुरू करण्यात येणार आहे. याद्वारे वर्षाला २०० ते २५० कोटी रुपये मिळतील.

अशाप्रकारे वर्षाला ५०० -६०० कोटी रुपयांची उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे. उत्पन्नाचे नवे स्रोत म्हणून एसटी महामंडळाचे प्रवासी ॲप विकसित करण्यात येत आहे. यामधूनही ॲप आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाइक सेवा पुरविण्यात येणार आहेत.

**पीपीपी तत्त्वावर महामंडळाच्या जागेचा विकास!**

पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) तत्त्वावर एसटी महामंडळाच्या जागांचा विकास करण्यात येणार आहे. यामध्ये कामगारांना सदनिका व विश्रामगृह बांधण्याचेदेखील प्रायोजन आहे. त्यातून कर्मचाऱ्यांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सार्वजनिक-खासगी भागीदारीतून होणाऱ्या प्रकल्प विकासातून महामंडळाची स्थावर मालमत्ता विकसित होईलच, त्याचबरोबर वर्षाला एक ते दीड हजार कोटी रुपये उत्पन्नदेखील मिळणे अपेक्षित आहे.

**करार पद्धतीची भरती प्रक्रिया ही तात्पुरती!**

पुढील वर्षी अखेरपर्यंत ८ हजार नवीन बसेस महामंडळाच्या ताफ्यात येणार आहेत. महामंडळाकडे एकूण १८-२० हजार बस संख्या करण्यात येणार आहे. यासाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया राबवण्याची परवानगी शासनाकडे मागितले आहे. शासनाची परवानगी मिळेपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात करार पद्धतीने कामगार भरती करण्यात येणार आहे. ही व्यवस्था वाढीव बसेसमधून प्रवाशांना सेवा देण्यासाठी करण्यात येईल. त्यामधून निश्चितच उत्पन्न वाढणार आहे, असेही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# ॲप वाहतूक सेवेवर सरकारचे नियंत्रण, प्रवाशांना मोठा फायदा... दोन दिवसांत नवे धोरण, काय बदल होणार?

राज्यातील ॲप आधारित वाहतूक सेवेबाबतचे धोरण येत्या दोन दिवसांत जाहीर केले जाणार असून या धोरणामुळे ॲप आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाइक टॅक्सी चालवणाऱ्या संस्थांवर सरकारचे नियंत्रण राहणार आहे. त्यामुळे प्रवाशांना आणि या संस्थेकडे काम करणाऱ्या चालकांना न्याय मिळेल, असा विश्वास परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी व्यक्त केला. या वाहतुकीच्या उत्पन्नातील ८० टक्के परतावा चालकांना देण्याची सुधारणाही या धोरणात असेल.

'इंडियन फेडरेशन ऑफ ॲप-बेस ट्रान्सपोर्ट वर्कर्स युनियन'च्या प्रतिनिधींची विशेष बैठक सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सरनाईक यांनी ही माहिती दिली. "ॲप आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाइक टॅक्सीसाठी सर्वसमावेशक धोरण नियमावली येत्या दोन दिवसांत जाहीर होत असून त्याद्वारे प्रवासी आणि चालकांच्या अनेक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे," असे सरनाईक यांनी सांगितले. या बैठकीला परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सहसचिव (परिवहन) किरण होळकर यांच्यासह आयएफएटीचे अध्यक्ष प्रशांत सावर्डेकर व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

"ॲप आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाइक टॅक्सी या सेवा पुरविणाऱ्या




संस्थांच्या संदर्भात अनेक तक्रारी प्रवासी व चालकांकडून प्राप्त झाल्या आहेत. यापैकी काही संस्था नफेखोरीच्या नादात प्रवासी व चालकांची आर्थिक लुबाडणूक करत असल्याचे वेळोवेळी निष्पन्न झाले आहे. त्यासाठी निश्चित नियमावली तयार करून वाजवी भाडे आकारणे, तसेच चालकांना उत्पन्नातील ८० टक्के परतावा देणे अशा महत्त्वाच्या सुधारणांचा समावेश असलेले धोरण येत्या दोन दिवसांत जाहीर केले जाणार आहे. या धोरणामुळे ॲप आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाइक टॅक्सी चालवणाऱ्या संस्थांवर सरकारचे नियंत्रण राहील. त्यामुळे प्रवाशांना आणि या संस्थेकडे काम करणाऱ्या चालकांना न्याय मिळेल," असे सरनाईक यांनी सांगितले.

**चालकांच्या हक्काचे, अधिकारांचे संरक्षण**

'राज्यातील बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी निर्माण करून देण्याच्या हेतूने या धोरणाच्या माध्यमातून ॲप आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाइक सेवा एकाच नियमावलीच्या छताखाली आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यामुळे या व्यवसायाला निश्चित अशी दिशा प्राप्त होईल. त्यातून प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासोबत चालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला जाईल,' असे सरनाईक यांनी या बैठकीनंतर सांगितले.

**सरनाईक यांच्या सूचना -**

- ॲप आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाइक सेवा पुरविणाऱ्या संस्थांनी व्यवसाय करताना प्रवासी व चालकांना केंद्रस्थानी ठेवावे.
- नफा कमविण्याच्या प्रयत्नांत लुबाडणूक करून व्यवसाय वृद्धी करू नये.

# २४,६३४ कोटींच्या चार नवीन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी... केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय

## महाराष्ट्रातील दोन रेल्वेमार्गांचा समावेश

■**नवी दिल्ली। प्रतिनिधी,**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत २४,६३४ कोटी रुपयांच्या चार प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. भारतीय रेल्वेच्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी उभारण्यात येणा[illegible]या प्रकल्पांमुळे महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि छत्तीसगड या चार राज्यांतील १८ जिल्ह्यांमध्ये रेल्वे नेटवर्कचा ८९४ किलोमीटरपर्यंत विस्तार होणार आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची घोषणा केली.

गोंदिया ते डोंगरगड : चौथी मार्गिका (८४ किमी महाराष्ट्र आणि छत्तीसगड), वर्धा ते भुसावळ तिसरी आणि चौथी मार्गिका (३१४ किमी, महाराष्ट्र), वडोदरा ते रतलाम : तिसरी आणि चौथी मार्गिका (२५९ किमी, गुजरात आणि मध्य प्रदेश), इटारसी ते भोपाळ ते बिना : चौथी मार्गिका (२३७ किमी, मध्य प्रदेश) असे हे चार प्रकल्प असतील.

"या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि छत्तीसगडमधील १८ जिल्ह्यांचा समावेश असेल. भारतातील सात रेल्वे कॉरिडॉर एकूण रेल्वे वाहतुकीपैकी ४१ टक्के वाहतूक करतात आणि हे प्रकल्प या कॉरिडॉरची क्षमता आणि कनेक्टिव्हिटी मजबूत करतील. या प्रकल्पांमुळे केवळ रेल्वेची क्षमता वाढणार नाही तर गर्दी कमी होईल, वेळ वाचेल आणि रेल्वे सेवांची विश्वासार्हता सुधारेल," असे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले.

या मल्टिट्रॅकिंग प्रकल्पांमुळे एकूण ८५.८४ लाख लोकसंख्येला थेट फायदा होईल. सुमारे ३,६३३ गावांना नव्या रेल्वे कनेक्टिव्हिटीचा लाभ मिळेल आणि विदिशा व राजनांदगाव जिल्ह्यांपर्यंत नव्या रेल्वे मार्गांचा विस्तार होईल. आता हे कॉरिडॉर चार पदरी आणि शक्य असेल तेथे सहा पदरी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही ते म्हणाले.



**चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना मान्यता**

बैठकीत चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्पांनाही मान्यता देण्यात आली. सहा प्रकल्पांना आधीच मान्यता देण्यात आली आहे आणि मंगळवारी चार नवीन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. ओडिशा, आंध्र प्रदेश आणि पंजाबमध्ये ४,५९४ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह हे प्लांट उभारले जातील, असेही अश्विनी वैष्णव म्हणाले.

## विद्यार्थिनीची आत्महत्या... जबाबदार शिक्षिकेवर कारवाई करा

# खासदार नरेश म्हस्के यांचा पोलीस प्रशासनाला इशारा

■**ठाणे । प्रतिनिधी,**

ऐरोलीतील सुशीलादेवी देशमुख विद्यालयातील दहावीची विद्यार्थिनी अनुष्का केवळेच्या आत्महत्येला जबाबदार असणाऱ्या शिक्षिकेसह शाळा प्रशासनावर दोन दिवसांत गुन्हा दाखल करून तात्काळ कारवाई करावी, अन्यथा नागरिकांच्या तीव्र रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा खासदार नरेश म्हस्के यांनी पोलीस प्रशासनाला दिला आहे.



ऐरोलीतील सुशीलादेवी देशमुख विद्यालयातील अनुष्का केवळे ही दहावी इयत्तेत शिकत होती. परीक्षा काळात तिच्या बाकाखाली एक चिट्ठी आढळली. कोणतीही खात्री अथवा चौकशी न करता ती नक्कल करत असल्याचा ठपका ठेवत शिक्षिकेने तिचा सर्वांसमोर अपमान केला. तिच्या आर्थिक परिस्थितीवरून जातीवाचक भाषेत अवमानकारक शब्द वापरले आणि संपूर्ण शाळेत सर्वांसमक्ष फिरवून तिची बदनामी केली.


हा अपमान सहन न झाल्याने १६ वर्षीय अनुष्काने मानसिक तणावाखाली आत्महत्या केली. ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक असल्याचे खासदार म्हस्के यांनी म्हटले आहे. शिक्षिकेच्या अपमानास्पद वागणुकीमुळे या कोवळ्या जीवाने टोकाचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. अनुष्काच्या कुटुंबियांची भेट घेऊन खासदार नरेश म्हस्के यांनी त्यांना सांत्वन केले आणि न्याय मिळवून देण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला.

# शेतीच्या वादातून भावकीच उठली जीवावर, तिघांनी महिलेचे पायच...

■**बीड। प्रतिनिधी:**

महाराष्ट्राच्या राजकारणात व समाजकारणात बीड जिल्ह्याला विशेष महत्व आहे. बीडमधून अनेक मोठे पुढारी राज्याला मिळाले आहेत. बीड आणि उसतोड कामगार हे एक वेगळं समीकरणही देशातल्या शेतीव्यवसायासाठी महत्वाचं आहे. दरम्यान, अशा या बीडमधून अनेक गुन्हेगारी घटनाही पुढे येत आहेत.

काही दिवसांपूर्वी उघडकीस आलेल्या संतोष देशमुख यांच्या निघृण मारहाण व हत्याप्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी व गुंडगिरी देशामध्ये चर्चेचा विषय बनला आहे. या जिल्ह्यातलं विनापरवाने पिस्तूल विक्री प्रकरणही बरचं चर्चेत होतं. बीड जिल्ह्यामधल्या राजकारणाने अनेकांचं राजकीय भवितव्यही धोक्यात आलं आहे. दरम्यान, बीड जिल्हा पुन्हा एकदा संतापजनक घटनेने हादरला आहे. या प्रकरणात एका महिलेला बेदम मारहाण



करण्यात आली आहे. तिचे पाय तोडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या सर्व वादामागे शेतीचं कारण असल्याचं समोर आलं आहे. सदर महिलेच्या नवऱ्याने यासंबंधी माहिती दिली आहे. दरम्यान, पीडित महिलेवर सध्या जिल्हा रुग्णालयामध्ये उपचार सुरु आहेत.

बीडमध्ये शेतीच्या वादातून थरकाप उडवणारी घटना घडली आहे. हे धक्कादायक प्रकरण बीड जिल्ह्याच्या नेकनुर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अंजनवती गावात घडले आहे. गावातल्या रघुवीर येडे याच्यासह भावकीतीलच तिघांनी एका महिलेला निर्दयपणे मारहाण करून चक्क तिचे पाय तोडण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

या हल्ल्यामध्ये आश्विनी येडे ही महिला गंभीर जखमी झाली आहे. आश्विनीवर सध्या बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. विशेष म्हणजे या आरोपीकडून याआधीही तीन महिलांवर अशाच पद्धतीने प्राणघातक हल्ला केला होता. त्या थरारक घटनांचा व्हिडिओ देखील समोर आला आहे.

सातत्याने महिलांवर अत्याचार करणाऱ्या या गुन्हेगारांना लगाम घालण्यासाठी आता पोलिस कोणती कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या घटनेमुळे बीड जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण उपस्थित केला जात आहे.

# एक तरुणी, दोन तरुण... दोघांचं एकाच मुलीवर प्रेम, दोघांमध्ये जोरदार वाद

■**वर्धा। प्रतिनिधी:**

वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरात प्रेमप्रकरणातून उद्भवलेल्या वादातून एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना आर्वी शहराच्या मध्यवर्ती गांधी चौकात घडली असून, या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मृत व्यक्तीचं नाव सलीम सबदर शा (वय ३०, रा. संजय नगर, आर्वी) असं असून, पोलिसांनी निखिल बुरे (रा. हरदोली) या तरुणास अटक केली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, सलीम आणि निखिल या दोघांमध्ये एका तरुणीवरून गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होता.



दोघांनाही तीच मुलगी आवडत असल्यानं त्यांच्यामध्ये वैर निर्माण झालं होतं. याच प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या वादाचे रूप काल थेट हाणामारीत बदललं. दुपारच्या सुमारास गांधी चौकात सलीम आणि निखिल यांच्यात पुन्हा वाद झाला. वाद चिघळताच निखिलने आपल्याजवळील धारदार शस्त्राने सलीमवर वार केले. या हल्ल्यात सलीम गंभीर जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने त्याला रुग्णालयात दाखल केलं. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केलं. घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आरोपी निखिल बुरे याला अल्पावधीतच ताब्यात घेण्यात आलं असून, त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

या घटनेमुळे आर्वी शहरात संतापाची लाट उसळली आहे. गांधी चौक परिसरात काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण असून, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी परिसरात बंदोबस्त वाढवला आहे. प्रेमसंबंधातून झालेल्या या हत्येनं आर्वी शहर हादरलं असून, पुन्हा एकदा युवकांमधील अस्थिर भावनांचा आणि रागाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## कोणार्क एक्स्प्रेसमध्ये क्षुल्लक कारणावरून वाद विकोपाला

# तरुणाला धावत्या ट्रेनमधून ढकलले, उपचारादरम्यान मृत्यू

■**कर्जत। प्रतिनिधी:**

भुवनेश्वर कोणार्क एक्स्प्रेसमध्ये क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात एका २० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही घटना मंगळवारी पहाटे सव्वादोनच्या सुमारास भिवपुरी स्थानकाजवळ घडली. मयत तरुणाचे नाव विनोद दरचंद कांबळे (वय २०, रा. वडगाव, पुणे) असून तो मित्र गणेश देवकर (२६) याच्यासह मुंबईकडे जात होता. दोघेही कोणार्क एक्स्प्रेसच्या दारात बसले होते. त्याचवेळी दुसऱ्या प्रवाशाला थुंकण्यासाठी जागा हवी असल्याने त्याने विनोदला उठण्यास सांगितले. या क्षुल्लक कारणावरून वाद पेटला आणि झटापट सुरू झाली. या झटापटीत विनोद गाडीबाहेर फेकला गेला.

गंभीर जखमी अवस्थेत पोलिसांनी त्याला कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मयत तरुणाचा मित्र सुखरूप असून पोलिसांना संपूर्ण माहिती दिली आहे. या प्रकरणी अकोला येथील मंगेश रामदास दरोसे (३६) यास रेल्वे पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. प्राथमिक माहितीनुसार, गाडी कर्जत स्थानकावरून रात्री २.१० वाजता निघाली. त्यानंतर भिवपुरी स्थानकाच्या अलीकडे ही घटना घडली. दरोसे मिरज स्थानकावरून अकोला जाण्याऐवजी चुकीने मुंबईकडे जाणाऱ्या गाडीत बसला होता. त्याचे वागणे थोडे विचित्र असल्याचे समोर येत आहे. या घटनेमुळे रेल्वे प्रवाशांमध्ये मोठी खळबळ उडाली असून कर्जत रेल्वे पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# लातूरमध्ये बहिणीला कॉलेजला सोडायला जाताना भीषण अपघात, बहिण-भावाचा मृत्यू

■**लातूर। प्रतिनिधी:**

जिल्ह्यातील राष्ट्राय महामार्गावर हिट अँड रनचा धक्कादायक प्रकार घडला असून भीषण अपघातात बहिण-भावाचा जागीच मृत्यू झाला आहे. औसाझनिलंगा राष्ट्रीय महामार्गावर आज दुपारी घडलेल्या भीषण अपघातात वाघोली येथील बहिण-भावाचा जागीच मृत्यू झाला. बोलेरो गाडी आणि ट्रकच्या दरम्यान आलेल्या दुचाकीला दोन्ही वाहनांनी धडक दिल्याने हा अपघात झाला. धडक दिल्यानंतर दोन्ही वाहने घटनास्थळावरून फरार झाली असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. घटनास्थळी स्थानिक व वाहनांनी गर्दी केली होती, पोलिसांना घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करण्यात आला आहे.



**लातूरमध्ये शिक्षणासाठी होती मुलगी**

दरम्यान, या घटनेत वाघोली येथील रहिवासी पद्माकर शिंदे यांचा मुलगा प्रसाद आणि मुलगी गायत्री या दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पद्माकर शिंदे हे शेती आणि दुग्ध व्यवसाय करतात. मुलगी गायत्री ही लातूरमध्ये शिक्षण घेत होती, तर प्रसाद वडिलांना शेती आणि दुधाच्या कामात मदत करत होता. पद्माकर शिंदे यांची ही दोनच अपत्यं असल्याने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची बातमी कळताच वाघोली गावात शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

औसा शहरातील पोतदार शाळेसमोर ही दुर्घटना घडली. बहिणीला कॉलेजला सोडण्यासाठी भाऊ प्रसाद शिंदे आणि गायत्री शिंदे हे दुचाकीवरून लातूरकडे निघाले होते. दरम्यान, लातूरकडे जाणाऱ्या बोलेरो गाडी आणि ट्रकच्यामध्ये दुचाकी आल्याने बोलेरोने जोरदार धडक दिली. त्यात दुचाकीचा तोल जाऊन दोघे रस्त्यावर पडले, आणि त्याच वेळी ट्रकने त्यांना चिरडले. या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर बोलेरो आणि ट्रक दोन्ही वाहनांचे चालक वाहनांसह घटनास्थळावरून पळून गेले आहेत. पोलिसांकडून सध्या दोन्ही वाहनांचा शोध सुरू आहे. पोलिसांचे पथक शोधासाठी रवाना करण्यात आल्याची माहिती औसा पोलीस ठाण्याचे अधिकारी रेवण धमाले यांनी दिली. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच औसा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असून पंचनामा करुन दोन्ही वाहनांचा शोध सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००० १४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com